**<u>प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जरंडेश्वर शुगर मिल्स प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ८०३, मुक्काम पोस्ट- चिमणगाव, तालुका-कोरेगाव, जिल्हा- सातारा यांच्या प्रस्तावित नविन मळीवर आधारित आसावणी प्रकल्प क्षमता - ८०.० किलोलिटर/दिन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत.</u>**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जरंडेश्वर शुगर मिल्स प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ८०३, मुक्काम पोस्ट- चिमणगाव, तालुका-कोरेगाव, जिल्हा- सातारा यांच्या प्रस्तावित नविन मळीवर आधारित आसावणी प्रकल्प क्षमता - ८०.० किलोलिटर / दिन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक ०८ जानेवारी, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ९७ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-५२९६ दिनांक ३० डिसेंबर, २०१९ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, सातारा - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, - **सदस्य**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **समन्वयक**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,

सातारा

श्री एल. एस. भड, उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, सातारा तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री भड यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स जरंडेश्वर शुगर मिल्स प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ८०३, मुक्काम पोस्ट- चिमणगाव, तालुका-कोरेगाव, जिल्हा- सातारा यांच्या प्रस्तावित नविन मळीवर आधारित आसावणी प्रकल्प क्षमता - ८०.० किलोलिटर / दिन संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग "अ" ५ (जे) मध्ये मोडत असल्याने त्यासाठी जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे

आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक १२ मार्च, २०१९ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, सातारा यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ०७ डिसेंबर, २०१९ रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवालाची प्रत मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय- सातारा, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सातारा, जिल्हा- सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी -जिल्हा परिषद, सातारा, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सातारा , तहसीलदार- कोरेगाव, तालुका कार्यालय- कोरेगाव, जिल्हा - सातारा, ग्रामपंचायत कार्यालये - चिमणगाव, तालुका- कोरेगाव, जिल्हा - सातारा, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

समन्वयक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित नविन आसवणी प्रकल्प स्थापनेबाबत श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, नालगोंडा जिल्हा, तेलंगण राज्य यांच्याकडून एक सूचना ईमेलव्दारे उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ सातारा यांना प्राप्त झालेली आहे. त्यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात

आलेली असून ते लेखी किंवा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. श्री भड यांनी पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

श्री सुनील थोरवे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सातारा तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी प्रकल्प अधिका-यांना व त्यांच्या पर्यावरण सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण असून हवा प्रदूषण नियंत्रणासाठी आधुनिक सयंत्रणा कार्यान्वित करणार आहेत. त्याचप्रमाणे प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी सुमारे ५० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. त्यांनी कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधीबाबत सविस्तर माहिती दिली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) <u>श्री राजाभाऊ जगदाळे, राहणार-कुमठे, तालुका - कोरेगाव, जिल्हा-सातारा:-</u>

जर सदरहू प्रकल्पासाठी १३० कोटी रुपयांची गुंतवणुक करण्यात येणार आहे, तर सदरहू प्रकल्पात किती स्थानिक लोकांना रोजगाराची संधि मिळू शकते?

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की सदरहू प्रकल्पात सुमारे १२५ स्थानिक व्यक्तींना रोजगाराची संधि मिळू शकण्याची ग्वाही देण्यात येते.

येथे प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी सांगीतले की १२५ स्थानिकांना रोजगाराची संधि ही प्रकल्प अगदी प्राथमिक स्वरुपात असतानाची गरज आहे. प्रकल्पात कंत्राटी व्यक्तींची गरज भासते. प्रकल्पामुळे अप्रत्यक्ष रोजगार व व्यवसायाच्या संधि ब-याच प्रमाणात उपलब्ध होतात. प्रकल्पामुळे लहान हॉटेल्स व वाहतुकीच्या व्यवसायात वाढ

होते. अशा आसवणी प्रकल्पात सुमारे ४५०-५०० लोकांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो असा अनुभव आहे.

२) **<u>श्री भास्कर शिवाजी कदम, राहणार-खेड नांदगिरी, तालुका-कोरेगाव, जिल्हा-सातारा:-</u>**

सदरहू अल्कोहोल प्रकल्पात किती स्पेंट वॉश उत्पन्न होईल व त्याची विल्हेवाट कशी करण्यात येईल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सदरहू प्रकल्पात सुमारे १३०.० घनमीटर प्रतिदिन एकाग्र (कॉन्सनट्रेटेड) स्पेंटवॉशची निर्मिती होईल व सदरहू स्पेंट वॉश हा इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येईल. प्रकल्पात मानकांपेक्षा ७५% स्पेंटवॉश कमी प्रमाणात तयार करण्यात येईल.

३) **<u>श्री आसिफ शिखलगार, राहणार-कोरेगाव, तालुका - कोरेगाव, जिल्हा-सातारा:-</u>**

सदरहु प्रकल्पात किती अल्कोहोल निर्मिती होईल? तसेच प्रकल्पाच्या आजूबाजूच्या शेतीस सदरहू प्रकल्पाचा काही त्रास होईल काय? त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पास किती खर्च होईल?

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की सदरहू आसवणी प्रकल्प हा ८०,००० लिटर प्रतिदिन क्षमतेचा प्रकल्प आहे. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असून सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न् होणारे सांडपाण्याचा उत्पादन प्रकियेत पुनर्वापर करण्यात येईल. त्यामुळे प्रकल्पाच्या आजूबाजूच्या शेतीस प्रकल्पाचा कुठलाही त्रास होणार नाही. आता आहे तसेच वातावरण राहिल. सदरहू प्रकल्पास १३०-१४० कोटी खर्च होईल त्यातील सुमारे ५० कोटी रक्कम ही पर्यावरण व्यवस्थापन योजनेवर खर्च करण्यात येणार आहे.

४) **<u>श्री प्रल्हादराव माने, राहणार-भोसे, तालुका - कोरेगाव, जिल्हा-सातारा:-</u>**

प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्याची विल्हेवाट कशी करण्यात येईल?

प्रकल्पाच्या उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणारे औद्योगिक सांडपाणी म्हणजे स्पेंटवॉश हा इन्सिनरेशन बॉयलरमध्ये जाळण्यात येईल. तसेच इतर विभागातून म्हणजे बॉयलर

ब्लोडाऊन व कुलींग ब्लोडाऊनमधील सांडपाणी एकत्र करुन ते कन्डेनसेट पॉलिशिंग युनिट (सीपीयु) मध्ये प्रक्रिया करुन त्याचा पूर्णपणे पुनर्वापर उत्पादन प्रक्रियेत करण्यात येणार आहे. त्यामुळे उत्पादनासाठी लागणा-या सुमारे ७८% ताज्या पाण्याची गरज भागेल.

५) **<u>श्री अमर साबळे, राहणार-विसापूर, तालुका - खटाव, जिल्हा-सातारा:-</u>**

या प्रकल्पामुळे ध्वनी प्रदूषणाचा त्रास हा स्थानिकांना होईल काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आसवणी प्रकल्पात मोठ्या प्रमाणात ध्वनि प्रदूषण उत्पन्न करणा-या यंत्रणा नसतात. प्रकल्पाबाहेर ध्वनिचा कुठलाही आवाज बाहेर जाणार नाही.

६) **<u>श्री सागर सांळुखे, राहणार-विसापूर, तालुका - खटाव, जिल्हा-सातारा:-</u>**

या प्रकल्पापासून येथील पंचक्रोशीतील लोकांना काय फायदा होईल?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की येथील पंचक्रोशीतील लोकांना निश्चितच फायदा होईल. स्थानिकांना प्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळणार आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पाचे अप्रत्यक्ष फायदे हे मोठ्या प्रमाणात होतील. स्थानिक व्यवसायात वाढ होईल. त्यामुळे वाहतुक व्यवसाय व लहान हॉटेल्समध्ये वाढ होईल. त्याचप्रमाणे अल्कोहोलच्या उत्पादनात फायदा झाल्यास भविष्यात शेतक-यांना ऊसासाठी जादा भाव देणे शक्य आहे. कामगारांना व स्थानिक उद्योगधंद्याना त्याचा फायदा होईल.

७) **<u>श्री धनाजी जगदाळे, राहणार-कुमठे, तालुका-कोरेगाव, जिल्हा-सातारा:-</u>**

सदरहू प्रकल्पाचा ऊस उत्पादक शेतक-यांना काय फायदा होईल?

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की सदरहू प्रकल्पाचा ऊस उत्पादक शेतक-यांना एफआरपी/रास्त व किफायतशीर दर देण्याच्या संदर्भात किंवा ऊसाला जास्त भाव देण्याच्या संदर्भात निश्चितच भविष्यात मदत होईल.

येथे प्रभारी प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी मत व्यक्त केले की ऊस उत्पादकांना काय फायदा होईल

यात स्थानिक शेतक-यांना उच्च प्रतीची ऊसबियाणे पुरविणे, शेतकी विकास, पाडेगावच्या गाईडलाईन्सप्रमाणे स्थानिक शेतक-यांना आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहन व प्रशिक्षण देणे या मुद्द्यांवर चर्चा होणे आवश्यक आहे. सदरहू प्रकल्पामुळे स्थानिक शेतक-यांना प्रकल्पाचा कसा फायदा होईल ह्याबाबत शेतक-यांना अवगत व जागृत्ती करणे गरजेचे आहे. याचा सादरीकरणात उल्लेख नाही. तो असणे आवश्यक असून बैठकीत या मुद्यांवर चर्चा होणे गरजेचे आहे.

श्री विजय जगदाळे, प्रकल्प प्रवर्तक यांनी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर स्पष्टीकरण देताना सांगितले की कारखान्यातर्फे स्थानिक शेतक-यांना उच्चप्रतीची ऊसबियाणे जी ऊस उत्पादन जास्त देतात ती उधारीवर उपलब्ध करुन देण्यात येतात. त्यांच्याकडून ऊसाचे पीक घेताना त्याप्रमाणे दर देण्यात येतो. त्याचप्रमाणे कारखान्यात तयार होणा-या प्रेस मडवर प्रक्रिया करुन त्याचे खतात रुपांतर करण्यात येते व ते स्थानिक शेतक-यांना अत्यल्प दरात देण्यात येते.

त्याचप्रमाणे कारखान्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर ठिबक सिंचन योजना/ड्रीप इरिगेशेन सिस्टिम राबविलेली आहे. त्यासाठी परिसरातील शेतक-यांना आर्थिक मदत व अनुदान देण्यात येते. जवळजवळ दीड ते दोन हजार हेक्टरवर ठिबक सिंचन योजना राबविण्यात आलेली आहे. ठिबक सिंचनामुळे ऊस उत्पादनात वाढ व पाण्याची बचत होते असा अनुभव आहे. अशा प्रकारचे प्रकल्प हाती घेण्यात येतील.

प्रकल्प प्रवर्तकांनी पुढे सांगितले की प्रकल्पात मृद परिक्षण प्रयोगशाळा (Soil Testing Laboratory) कार्यान्वित करण्यात येणार असून स्थानिक शेतक-यांना जमिनीचा पोत सुधारण्यासाठी व जेणेकरुन शेतक-यांना एप्रिल महिन्यातच उत्पन्न घेण्यात येईल याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आक्षेप नोंदविला की जे नविन कामगार ५० घेणार असे जरी सांगितले तरी त्याचे विश्लेषण दिलेले नाही.

त्याचप्रमाणे प्रकल्पात पर्यावरण विभाग (Environment Cell) स्थापन करताना त्यात किती लोक घेणार याबाबत काहीही माहिती सांगण्यात आलेली नाही. पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिले की जरी सादरीकरणात उल्लेख केलेला नसला तरी त्याचा उल्लेख पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात त्याची नोंद घेण्यात आलेली आहे.

८) **<u>श्री राजेन्द्र नामदेव भोसले, राहणार-किणी, तालुका - कोरेगाव, जिल्हा-सातारा:-</u>**

ऊस उत्पादन प्रकल्प हा हंगामापुरताच चालतो. त्याचप्रमाणे आसवणी प्रकल्प हा किती दिवस चालेल?

प्रकल्प सल्लागार यांनी उत्तर दिले की आसवणी प्रकल्प हा वर्षात ३३० दिवस कार्यान्वित राहिल.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, सातारा यांनी ईमेलव्दारे एक सूचना प्राप्त झालेली आहे. त्यांनी बैठकीत ती सूचना वाचून दाखविली.

श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, धरित्री पर्यावरणा परिरक्षणा संस्था, नालगोंडा जिल्हा, तेलंगण राज्य यांनी प्रकल्प कार्यान्वित होण्यासाठी पाठिंबा दर्शविताना काही सूचना केल्या. त्यांनी सांगितले की भारतात १८ ते ३५ वयातील ४० कोटी युवक हे नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत. त्यासाठी विविध प्रकल्पांची उभारणी व औद्योगिक विकास आवश्यक आहे.

श्री रेड्डी यांनी प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी योग्य प्रकारे पर्यावरणाचे सर्वेक्षण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी सूचना केल्या की -

अ) प्रकल्पाच्या १० कि.मी. त्रिज्येतील परिसरातील लोकांची आरोग्य सद्यस्थिती, पीकांची सद्यस्थिती व भूगर्भातील पाण्याची पातळी याचा अहवाल तयार करण्यात यावा.

ब) नदीतील पाणी हे बारमाही मिळत नाही. त्यामुळे पावसाळ्यात मिळणारे अतिरिक्त पाणी प्रकल्पात मोठी साठवण टाकी बांधावी,

क) पावसाचे पाणी संवर्धन करण्याची यंत्रणा विकसित करण्यात यावी व त्याचे साठवण करण्यात यावे.

ड) प्रकल्प परिसरातील गावांमध्ये हरितपट्टा विकसनाचा कार्यक्रम त्वरित राबविण्यात यावा,

इ) परिसरातील युवक युवतींसाठी कौशल्यविकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा, जेणेकरुन युवक व युवती या प्रकल्पात वा अन्य प्रकल्पात काम करण्यास सक्षम होतील. त्यांनी सांगितले की जपान, कोरिया देशात ९५%युवक युवतींना कौशल्यविकास प्रशिक्षण देण्यात येते, तर भारतात फक्त ५-६% युवक, युवतींना प्रशिक्षण मिळते,

ई) प्रकल्प प्रवर्तक, स्थानिक शासकीय अधिकारी व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधीच्या योग्य वापरासाठी समिती गठित करण्यात यावी,

त्यांनी प्रकल्पास शुभेच्छा दिल्या.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की सदरहू सूचना बैठकीच्या इतिवृत्तासोबत केंद्र शासनास सादर करण्यात येईल.

सदस्य व समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप वा टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून प्रतिसाद नव्हता. त्यावेळी समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप, टिकाटिप्पणी यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा अंतर्भाव हा बैठकीच्या इतिवृतान्तात करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त, लेखी सुचना व अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत प्रथम मप्रनिमंडळाच्या

मुख्यालय, मुंबई यांच्यामार्फत केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयातील तज्ज्ञ समितीस सादर करण्यात येईल. तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी उपस्थितांन आवाहन केले की ते लेखी सूचना सादर करु शकतात.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित स्थानिकांचे, शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी यांचे आभार मानले व बैठकीचे कामकाज पूर्ण झाल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थिगत करण्यात आली.

( )

**एल. एस भड,**

समन्वयक,

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

उप प्रादेशिक अधिकारी,,

मप्रनि मंडळ, सातारा

( )

**जे. एच. सांळुखे,**

सदस्य,

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी

समिती

तथा

प्रभारी प्रादेशिक अधिकारी,

मप्रनि मंडळ, पुणे

**(सुनील थोरवे)**

अध्यक्ष,

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सातारा

जिल्हा- सातारा